International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 12 No.2 Nov-Dec 2024

# वज्रयान पंथातील स्त्रीप्रतीमांचे समाजशास्त्रीय विश्लेषण

**कल्पना उत्तम म्हस्के**
रिसर्च स्कॉलर(इतिहास विभाग)
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.
**Corresponding Author: कल्पना उत्तम म्हस्के**
**DOI- 10.5281/zenodo.14551653**

**प्रस्तावना:**

बौद्धधर्मामध्ये महायान व हीनयान या पंथाच्या निर्मितीने दोन तांत्रिक दृष्ट्या भिन्न विचारप्रवाह प्रस्थापित झाले. त्यापैकी महायान पंथातून वज्रयान पंथाची निर्मिती झाली मध्युगीन भारतात बौद्ध धर्माच्या ऱ्हासाची प्रक्रिया सुरु असताना महाराष्ट्रात मात्र बौद्ध धर्माची मुळे घट्ट रुजत होती. महाराष्ट्रातील मध्यकाळ हा बौद्ध धर्माच्या उर्जीतावस्थेचा काळ होता. त्याचे महत्वाचे कारण म्हणजे वज्रयान पंथाचा बौद्ध धर्मांतर्गत झालेला उदय होय.

बौद्ध कलेची सुरुवात गौतम बुद्धाच्या जीवन आणि शिकवणुकीला समाजात रुजविण्यासाठी इ.स.पू. पाचव्या ते साहव्या शतकात झाली. बौद्ध कलेमध्ये मुख्यतः विविध प्रकारच्या लेण्या, बुद्धविहारे दगडावरील कोरीव चिन्ह, बुद्धाच्या विविध प्रतिमा व मुद्रा यांचा समावेश होतो. वाज्रयान पंथ हा एक तांत्रिक पंथ असल्यामुळे त्यामध्ये शक्तीपुजेला महत्वाचे स्थान प्राप्त झाले आहे, वज्रयान पंथाने लिंगभाव आणि लिंगभाव वैशिष्ट्ये यामध्ये भेद केला आहे. प्रज्ञा म्हणजे शहाणपण किंवा ज्ञान. आणि ज्ञान म्हणजेच माता. ज्ञानाचा संबंध व्यक्तीच्या लिंगाशी किंवा तिच्या प्रसवक्षमतेशी नसून व्यक्तीच्या आकलन शक्तीशी आहे असा त्यांचा स्त्रीकडे बघण्याचा नवीन दृष्टीकोन होता.

वज्रयान पंथातील स्त्री प्रतिमांचे कार्यक्षेत्र केवळ चूल आणि मुल यांच्या पुरतेच मर्यादित नाही तर त्यांनी तिचे क्षेत्र ज्ञान आणि अध्यात्म यांच्यापर्यंत व्यापक केले आहे. वज्रयान पंथाच्या स्त्री प्रतिमा वैदिक समाजातील असलेल्या मातेच्या रूपातील स्त्रीप्रतीमेपेक्षा खूप वेगळ्या आहेत. वैदिक स्त्री देवतांच्या संदर्भात स्त्रीत्व आणि देवित्व यांचे एक्सात्विकरण केल्यामुळे स्त्रीला कायम देविप्रमाणे वागणे बंधनकारक ठरले. नेहमी त्यागाची मूर्ती बनून राहणे क्रमप्राप्त होते. अशा स्त्रीप्रतीमाना सर्वात प्रथम छेद वज्रयान पंथातील स्त्री देवतामधून प्रतिबिंबित होणाऱ्या स्त्री प्रतीमामुळे मिळाल्याचे दिसून येते.

वज्रयान पंथातील प्रमुख देवता एकजत, निरात्मा, मारीची वज्रवाश, कुरुकला, वसुंधरा, खारीवार्णी, तारा आणि प्राणेश्वरी या देवतांचे वैशिष्ट्ये असे की त्या शून्यतेच्या म्हणजेच प्रज्ञेच्या अविष्कार आहेत आणि मानवी जीवनात येणाऱ्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी त्या मानवाला सहाय्य करतात. एकजटादेवी इंद्र, ब्रम्हा आदि वैदिक देवतांना आपल्या पायाखाली तूडविते या तिच्या कृतीकडे स्त्रीवादी समीक्षेच्या दृष्टीकोनातून पहिले तर असे दिसते की इंद्र हि देवता स्त्रीलंपट, दुर्गुणी म्हणून प्रसिद्ध आहे. म्हणूनच समाजातील अशी वृत्ती असलेल्या पुरुषांचे इंद्र प्रतिनिधित्व करतो याची या स्त्रीला येथे जाणीव आहे म्हणूनच त्या पुरुषाविरुद्ध बंड पुकारताना दिसतात.

**विषयाची निवड :**

बौद्ध धर्मातील मूर्तीकला, शिल्पकला, चित्रकला यावर पुष्कळ प्रमाणात लेखन संशोधन झालेले दिसते परंतु वज्रयान पंथातील स्त्री देवता व स्त्री प्रतिमा अशा प्रकारच्या विषयावर सखोल अभ्यास होणे आवश्यक आहे. स्त्रीवाद हि विचारसरणी आधुनिक असली तरी वज्रयान पंथातील स्त्रीप्रतीमांचा सामाजिक अर्थ स्पष्ट करता येतो. वज्रयान पंथातील स्त्रीप्रतिमा फक्त संकटकाळी भक्ताच्या मदतीला धावून जाणाऱ्या नाहीत. तर त्या स्वतः चा उद्धार करून इतरांचाही उद्धार करतात. या सर्व बाबींचा अभ्यास करून वज्रयान पंथातील स्त्रीप्रतीमांचा सामाजशास्त्रीय अन्वयार्थ सांगणे शक्य आहे.

**उद्धीष्ट्ये :**

1. वज्रयान पंथातील विविध स्त्रीप्रतीमांचा अभ्यास करणे
2. वज्रयान पंथातील स्त्री-देवता व प्रतिमांचा सामाजिक अर्थ स्पष्ट करणे.
3. वाज्रायानातील स्त्रीविषयक धार्मिक आचरनामागील भूमिका स्पष्ट करणे.

**गृहितके :**

1. वज्रयान पंथातील स्त्रीविषयक विचार प्रतिमा व प्रतिक यारुपात मांडलेले आहे.
2. वज्रयान पंथातील स्त्रीप्रतिमा या ज्ञान किंवा प्रज्ञा अशी स्वंतत्र ओळख असलेल्या आहे.
3. वज्रयान पंथात मातृपुजेला महत्व दिलेले आहे.

**वज्रयान पंथाचा उदय :-**

बौद्ध तांत्रिक सिद्धांताची उत्पत्ती साधारणतः सातव्या शतकात मानली जाते परंतु काही विद्वान ही परंपरा फार पूर्वीची असल्याचे मानतात. ते शाक्यमुनीच्या पूर्वी सुद्धा वज्रयान परंपरेचे अस्तित्व सिद्ध करतात. सुवर्णप्रभाससूत्रा मध्ये देवयुगमंडळ सारखे स्थळ आहेत तिथे

तंत्र क्रिया पद्धतीचे शिक्षण दिले जात होते आणि हारीतीकी, चंडिका इ. देवीचा उल्लेख येतो.(जैन २०००:५) याचाच अर्थ असा की वज्रयान पंथात फार पूर्वीपासून स्त्रीदेवता व स्त्रीप्रतिमांचा समावेश झालेला दिसतो.

वा. गो. आपटे यांनी 'बौद्धपर्व' मध्ये नमूद केले आहे की बौद्ध धर्मातील प्रमुख दोन उपपंथापैकी महायान व हीनयान यांचे तत्वज्ञान लोकांना अवघड वाटू लागले म्हणून त्यांनी महायान पंथातून निर्माण झालेल्या मंत्रयान या पंथाला स्वीकार केले. हा पंथ सातव्या शतकानंतर कित्येक वर्ष उत्कर्षावस्थेत होता. नंतर काही काळाने हाही मागे पडून वज्रयान एक नवाच पंथ उदयाला आला. अशा पद्धतीने ( आपटे वा.गो. २०१३:१७९-१८०) वज्रयान पंथाच्या उदयाची पार्श्वभूमी स्पष्ट होते.

महायान पंथातील परमश्रेष्ठ प्रतीचे ज्ञान मिळण्यासाठी ऐहिक संसारापासून अलिप्त होऊन प्रथम कामलोकास, नंतर रुपलोकास व त्यानंतर अरुपलोकास जाऊन क्रमाने व्यक्ती निर्वाण प्राप्त होते. या निर्वाणाच्या स्वरूपाचे आकलन सामान्य बुद्धीला करता येत नाही म्हणून वज्रयान पंथात त्याला मूर्तरूप देण्यात आले व त्या स्वरूपाला 'निरात्मा देवी' असे नाव मिळून तिची स्थापना अरूप लोकामध्ये झाली. त्या लोकांपर्यंत चढत येणारे मन निरात्मा देवीच्या आलिंगनाने परम सुखाचा प्रत्यक्ष अनुभव होऊ लागते व त्या सुखातच निरंतर निमग्न होऊन लय पावते, असे एक नवे मत प्रश्तापित झाले यालाच वज्रयान म्हणतात या मातातला लोकांवर मोहिनी घालणारा भाग म्हणजे निरात्मा देवीच्या संगतीत अक्षय व निरुपम सुखप्राप्तीची आशा हा होता. वज्रयान पंथ हि महायान पंथाची एक शाखा आहे. याचा उदय सातव्या शतकात झाला आणि जवळजवळ बाराव्या शतकापर्यंत तो अस्तीत्वात होता. 'साधनमाला' या वज्रयानी ग्रंथामध्ये कामाख्य, श्रीहट्ट, पुरणगिरी आणि उडीयान या ठिकाणी वज्रयान बौद्ध पंथाची मूळ पीठे होती. बाराव्या शतकाच्या दरम्यानच्या काळात नागार्जुन व अनंगराज या सारख्या वज्रयानी पुरुष तांत्रिकानी वज्रयान पंथातील तंत्र-मंत्र-सिद्धांत आदीवर लिखाण केलेले आहे. तसेच भगवती लक्ष्मी, सहयोजीनी चीव्हा यांच्या सारख्या स्त्री तांत्रिकानीही लिखाण केलेले आहे. वज्रयान बौद्ध पंथातील विचारांना सुसंगत आणि सुबद्धपणे मांडण्यामध्ये त्यांनी केलेली कामगिरी महत्वाची होती.(छत्रे लता (२००५)११८-११९).

स्त्री तांत्रिकानी केलेला लेखनाचा प्रयत्न या कालखंडात महत्वाचा मानावा लागेल स्त्रियांच्या स्थितीत शिथिलता आल्याचे हे लक्षण असावे असे दिसते.

बौद्ध धर्म हा लोकांच्या कल्याणामध्येही हातभार लावणारा धर्म आहे. त्याचा प्रचार करताना वज्रयानीना तत्कालीन समाजात प्रचलित आणि लोकप्रिय असललेल्या तंत्राचा वापर करावा लागला असे दिसते. तत्कालीन समाजात अस्तित्वात असणाऱ्या पंथाशी, रीतीरीवाजाशी तडजोड करावी लागली याचाच परिणाम म्हणजे या पंथामध्ये स्थानिक तसेच आदिवासी देवदेवताचा समावेश झाला. देवदेवता आणि त्यांची पूजा अर्चा वज्रयान पंथाचे केंद्रस्थान ठरले. हा एक तांत्रिक पंथ असल्यामुळे त्यात मातृपूजा व शक्तीपूजेला महत्वाचे स्थान प्राप्त झाले.

महाराष्ट्रातील बुद्धधम्माचा इतिहास' यामध्ये मा.श.मोरे लिहितात "बुद्ध धम्मात वज्रयानाचा केव्हा आणि कसा उगम झाला हे सांगता येणे कठीण आहे. महायान पंथास धर्मकाय, संभोगकाय आणि निर्मानकाय अशा बुद्धाच्या कल्पनेला मान्यता मिळाली होती, धर्माकाय बुद्धाला वज्रयानात 'आदिबुद्धाचे ' स्वरूप देण्यात आले. त्याचे दुसरे नाव "वज्रधारा " असे आहे. ( मोरे : २००९ : ८२-८३)

वज्रयानात आणि तंत्रयानात अनेक कल्पना सृष्टीत सापडणारे, सर्पादिक प्राणीमात्र नद्या, पर्वत इत्यादींना स्त्रीरूपे देण्यात आली आणि त्यांच्या त्याप्रमाणे मूर्ती घडविल्या गेल्या. नांबाल हा कुबेरा सारखा संपत्तीचा अधिपती मानण्यात येऊ लागला त्याला लोकपाल अशी पदवीही देण्यात आली. गंगा, यमुना, सरस्वती इत्यादी नद्यांना स्त्रीरूपे देण्यात आली आणि त्यांच्या मुर्त्या बनविण्यात आल्या. बारा धारिणीपैकी एक धारिणी 'चुंदा' हि सर्व मंत्राचे प्रतिक मानून तिच्या मुर्त्या बनवल्या गेल्या त्याच प्रमाणे जादुकलेची महामायापुरी म्हणून तिची उपासना होऊ लागली. वज्रयानात आणि तंत्रयानात हारिती, पांचिका इत्यादी अनेक शक्तीची पूजा होऊ लागली

अशाप्रकारे वज्रयान पंथात आपल्याला हारीतिका, चंडिका, निरात्मादेवी अशा देवीचा उदय झाल्याचे दिसून येते व पुढील काळात तर स्त्री तांत्रीकानी लिखाण केल्याचे पुरावेही मिळतात. यावरून स्पष्ट होते की, वज्रयान बौद्ध पंथात स्त्रियांना नवीन दृष्टीकोनाअंतर्गत समाविष्ट करून घेतले होते.

**समाज शास्त्रीय दृष्टीकोनातून वज्रयान पंथाचे स्वरूप**

इ. स. ७००-१००० दरम्यान सम्पूर्ण भारतभर तंत्रमार्गाचा प्रसार होऊ लागला. या पंथाची विचारधारा स्त्री व पुरुष देह एकत्र येण्याच्या क्रियेबद्दल असलेल्या गूढ आकर्षणातून निर्माण झाली. तंत्रमार्गी तत्वज्ञान अतिशय गुप्त होते. त्यांच्या साधनेत पंचमकाराना अतिशय महत्व होते. ते मातृशक्तीचे/ देवीचे उपासक असत पंचमकार म्हणजे मांस, मद्य, मत्स्य, मुद्रा आणि मैथुन या सर्व गोष्टीचा प्रभाव तंत्रमार्गातील कला व शिल्पावर दिसून येतो.(ऑम्वेट गेल (२००३)१४०-१४१)

वज्रयान पंथाकडे समाजशास्त्रीय दुर्ष्टीने पाहू गेल्यास ब्राम्हणी हिंदू धर्माचे प्राबल्य असतानाच्या काळातला बौद्धधम्म असे त्याचे वर्णन गेल ऑम्वेट करतात. तंत्रमार्ग हा अतिशय प्राचीन काळातील कृषक जमीनच्या सुपिकतेशी निगडीत असलेल्या विधीमध्ये या मार्गाचे मूळ आहे असे त्या मानतात. त्यात मानवी शरीर हे विश्वाचे प्रतिक असते तर स्त्री – पुरुषांचे मिलन म्हणजे पृथ्वी आकाश (वर्षा ) यांचे मिलन होय. ज्यातून बीज रुजले जाते असे मानले जाई.

तंत्र मार्गातील पंथाकडे जाती व्यवस्थेविरुद्ध किंवा शुद्ध-अशुद्धतेच्या पायावर समाजरचने विरुद्ध केलेले बंड

म्हणूनहि बघता येऊ शकते. समजा रचनेत अस्पृश्यांची जागा तळात तर अतिशय शुद्र असे ब्राह्मण सर्वात वरती अशी उतरंड होती. तंत्रामार्गाने दिलेले धक्के ब्राम्हणी धर्म व्यवस्थेत रूळलेल्यांकरता हितावहच ठरले असण्याची शक्यता ऑम्वेट गेल वर्तवतात. पुढे त्या म्हणतात तंत्र मार्गी साधक बव्हंशी कनिष्ट जातीमधील असत किंवा ते स्वतः ला तसे म्हणून घेत असत. सर्वत्र संचार करणाऱ्या सिद्धपुरुषांनी कनिष्ट जातीतील स्त्रीयांचा पत्नी म्हणून केलेला स्वीकारही हेच सांगतो.(गेल १४१)

वज्रयान पंथाने जाती व्यवस्था विरोधातही बंड केल्याचे दिसून येते. स्त्री-पुरुष समतेबरोबरच जाती व्यवस्थेवर प्रहार करण्याचे महत्वाचे कार्य वज्रयान पंथीयांनी केल्याचे दिसून येते. वज्रयान पंथाबद्दल अनेक विवाद असूनही वज्रयान पंथाने वासना, दुःख व पुनर्जन्माच्या फेऱ्यात अडकलेल्या या जगापासून मुक्ती मिळविण्याकारीता आवश्यक असलेली प्रज्ञा हेच आपले ध्येय मानले होते. 'एकांतवासाच्या' योगे तुम्ही ज्ञान मिळविण्यास समर्थ झाले पाहिजे. लोकोपयोगी ज्ञान मिळवून ते पूर्णत्वाला नेणे यालाच प्रज्ञापारमिता म्हणतात. प्रज्ञा म्हणजे लोककल्याणाची तीव्र अपेक्षा धरून मिळविलेले सात्विक ज्ञान होय आणी ते मिळविण्यास तुम्हाला लहानपणापासून शिकले पाहिजे असे धर्मानंद कोसंबी 'जातक कथेत लिहितात.(कोसंबी ५-६)

**वज्रयान पंथातील स्त्रीप्रतिमा**

वज्रयान हा एक तांत्रिक पंथ असल्यामुळे त्यामध्ये माता या संकल्पनेला खूप महत्व आहे. भारतीय समाजात माता हि स्त्रीची केवळ जीवशास्त्रीय ओळख नसून टी तिची सामाजिक आणि सांस्कृतिक ओळखही आहे. परंतु मातृत्वाचा संबध स्त्रीत्वाशी न जोडता त्याचा नव्याने अन्वयार्थ लावण्याची गरज आहे. वज्रयानपंथी लेखकांनी बौद्धधर्मातील बऱ्याचशा संकल्पनांचा नव्याने अन्वयार्थ लावून आपले विचार मांडत असताना त्यांचा उपमा रूपके यांच्या सारखा वापर केलेला दिसतो. उदा. प्रज्ञा, करुणा, मुदिता,मैत्री तसेच उपेक्षा याचा अर्थ वज्रयान पंथाच्या अनुयायांनी मूळ बौद्ध धर्मातील अर्थापेक्षा वेगळा लावून त्या संकल्पनांचा उपयोग स्त्रीचे स्वरूप सांगण्यासाठी उपमांसारखा केलेला आहे.(छत्रे लता (२००५)११७-११८)

स्त्रीदेवातांची पूजा फक्त वज्रयान पंथातच नाही तर फार पूर्वीपासून वैदिक धर्मातही केली जात होती. परंतु नेहमी भक्त संकटात असताना वैदिक धर्मातील देवतांना मदतीला धावावे लागते अशा प्रकारच्या स्त्रीप्रतिमांना सर्वात प्रथम छेद वज्रयान पंथातील स्त्रीदेवतामधून प्रतिबिंबित होणाऱ्या स्त्रीप्रतीमांमुळे मिळाल्याचे दिसून येते. वज्रयान पंथातील स्त्रीदेवताही पराक्रमी, कर्तृत्ववान आहेत पण त्या केवळ दुसऱ्यांसाठी नाही तर स्वतःपनही आहेत त्या स्वतःच आपल्या वरील अन्यायाचा अत्याचाराचा बदला घेतात. त्यासाठी त्यांना दुसऱ्या कोणाचीही मदत घ्यावी लागत नाही.(छत्रे १३४)

वज्रयान पंथामध्ये प्रमुख देवता म्हणजे एक्जटा, निरात्मा, मारीची, वज्रवारही कुरुकुला वसुधारा खारीवणी, तारा आंनी प्राणेश्वर या आहेत. यांचे वैशिष्ट्ये असे की त्या शून्यतेच्या म्हणजेच प्रज्ञेच्या अविष्कार आहेत. त्यामुळेच त्या ज्ञानमायी आहेत. आणि मानवी जीवनात येणाऱ्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी त्या मानवाला सहाय्य करतात. या सर्व स्त्री देवता मातृत्वाचे आणि करुणेचे प्रतिक आहेत. एकजरा आणि निरात्मा या पराक्रमी व कर्तृत्ववान स्त्रियांचे प्रतिक आहेत. निरतं या देवतेचा संबध ज्ञानाशी आहे. एकजरा देवी इंद्र ब्रह्मा आदी वैदिक देवांना आपल्या पायाखाई तुडविते तिच्या या कृतीकडे स्त्रीवादी समीक्षेतून बघितले तर प्रस्थापीत समाज व्यवस्थेविरुद्ध अत्याचाराविरुद्ध बंड पुकारण्याचे धाडस तिच्यात दिसते. 'इंद्र' हा स्त्रीलंपट व दुर्गुणी असा आहे म्हणून अशी वृत्ती असलेल्या पुरुषाविरुद्ध बंड करताना एकजरा देवी दिसते. (छत्रे १३४-१३५).

**सारांश**

'वज्रयान' पंथातील स्त्रीप्रतीमांचे समाजशास्त्रीय विश्लेषण या लागुशोध निबंधात पुर्पापर चालत आलेल्या स्त्रीविषयक विचारांचा विश्लेषक पद्धतीने अन्वयार्थ लावण्याचा प्रयत्न केला आहे. वैदिक धर्म, बौद्ध धर्म यापेक्षा वज्रयान पंथातील स्त्रीप्रतिमा कशा प्रकारे समाजात आपले प्रतिनिधित्व करतात याचाही विचार केला गेला आहे. वज्रयान पंथातील स्त्रीपातीमा व देवी देवता ह्या ब्राह्मणी व्याबस्था व तत्कालीन जातीव्यवस्था यांना आव्हान देणाऱ्या दिसून येतात. वज्रयान पंथात लिंगभाव व लिंग वैशिष्ट्ये यामध्ये भे केला आहे जी व्यक्ती ज्ञानी आहे अशीच व्यक्ती त्यांना अभिप्रेत आहे. एकजता देवी ब्रम्हदेवाला पायाखाली तुडविते .ब्रह्मदेव पुरुषसत्ताक कुटुंब पद्धतीचे प्रतिनिधित्व करतो.ब्राम्हपासून जगाची निर्मिती झाली असे मानले जाते वास्तविक हा विचार स्त्रीवर अन्याय केल्यासारखाच आहे. कारण प्रसवक्षमता ही स्त्रीकडे निसर्गाने बहाल केलेली दिसते. मारीची देवीच्या हातात सुई-दोरा दिसून येतो टी दुष्टांचे डोळे व तोंड शिवण्याचे काम करत असते.

वज्रयान पंथात एकीकडे स्त्रीला माता, देवी, शक्ती म्हणून बघितले जाते तर दुसरीकडे धार्मिक आचरणातून येणारी स्त्री प्रतिमा अशा परस्परविरोधी प्रतीमामागे नेमके काय कारण असावे या सांस्कृतिक सामाजिक, तात्विक दृष्टीकोनातून विचार करता येतो असे असले तरी वज्रयान पंथाने स्त्रियांमध्ये आत्माविश्वास, स्वजागृती व स्वजानिवेनेचे विविध पातळीवर समायोजन केलेले दिसते.

**संधर्भ सूची**

1. भास्कर जैन भागचंद्र (संपा) (२०००) हे वज्रतंत्र – योगरत्नमाला, सन्मती प्राच्य शोध संस्थान, नागपूर(पृ.५)
2. आपटे वा.गो.,(२०१३), समन्वय प्रकाशन कोल्हापूर, पृ.१७९-१८०
3. छत्रे लता,(२००५): बौद्धधम्मातील स्त्रीविचार, सुगावा प्रकाशन पुणे (पृ.११८-११९)

4. मोरे मा.श.(२००९) : महाराष्ट्रातील बुद्ध धम्माचा इतिहास, कौशल्य प्रकाशन औरंगाबाद (पृ. ८२-८३)
5. ऑम्वेट गेल (२०१५) : भारतातील बौद्धधम्म ब्राम्हणीधर्म व जातीयतेला आव्हान, सेज प्रकाशन पुणे(पृ. १४०-१४१)
6. कोसंबी धर्मानंद, (२०११) जातक कथा, नेहा प्रकाशन नागपूर(पृ. ५-६)
7. उपरोक्त, छत्रे लता,(११७-११८)
8. उपरोक्त छत्रे लता,(पृ.१३४)
9. उपरोक्त छत्रे लता,(पृ. १३४-१३५)